# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- द्ध्द्धःद्.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २२-२३ दिनांक २४/०१/२०२३

## १९,६०,०००/-रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) नावाचा अंमली पदार्थ बाळगणा-या ईसमावर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

दिनांक २१/१/२०२३ रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षातील अधिकारी व अंमलदार हे काशिमिरा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात गस्त करीत असताना सगनाय मंदिराचे डाव्या बाजुच्या रहदारीच्या रस्त्यालगत, काशिमिरा येथे एक संशयित ईसम दिसुन आला. सदर वेळी त्यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असताना तो पळु लागल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेउन त्याची अंग झडती घेतली असता त्याचे कब्जात ९८ ग्रॅम वजनाचा व १९,६०,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. नमुद इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने नामे फहिम करीम खान, वय ५४ वर्षे, रा. नलासोपारा पुर्व. ता. वसई असे सांगितले. नमुद आरोपीताविरुध्द काशिमिरा पोलीस ठाणेत गु.रजि.नं.।। ५२/२०२३, अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २२ (क) प्रामणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद आरोपीतास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक,अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स.पो.नि. विलास कुटे, पो.हवा. पी.डी.टक्के, एस.ए.आव्हाड, सुनिल कुडवे, पो.अंम. अजय यादव यांनी केली.

-----ooo-----